गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ९६ वा ● शुक्रवार २३ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 96 | Date : 23/08/2024 | blow Friday | Page 4 Price 4


# गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अनुराधा पौंडवाल यांना प्रदान

## तर राज्य सांस्कृतिक पुरस्कार रोहिणी हट्टंगडी यांना प्रदान



**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीसाठी अत्यंत महत्त्वाचे आणि मानाचे समजले जाणारे राज्य शासनाचे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार हे राज्यातील १३ कोटी जनतेचे प्रतिनिधी म्हणून राज्य शासनामार्फत दिले जातात. हे पुरस्कार अनमोल असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

वरळी येथील एन एस सी आय डोम येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. य

ावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांच्यासह चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२४ प्रख्यात गायिका अनुराधा पौडवाल यांना , प्रख्यात अभिनेत्री रोहिणी हट्टगंडी यांना चित्रपटांसाठी राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ आणि कंठसंगीतासाठी प्रख्यात गायक सुदेश भोसले यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार २०२३ शिवाजी साटम, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार २०२३, दिग्पाल लांजेकर यांना प्रदान करण्यात आला. स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्कार २०२३ आशा पारेख यांना तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार २०२३ एन चंद्रा यांना प्रदान करण्यात आले.

तसेच यावेळी पुढील पुरस्कारांचे वितरण करण्यात आले ५८ वे राज्य चित्रपट पुरस्कार खालीलप्रमाणे –

सर्वोत्कृष्ट कथा :शंतनू रोडे (गोष्ट एका पैठणीची), पटकथा : मकरंद माने, विठ्ठल काळे (बापल्योक ), उत्कृष्ट संवाद : शंतनू रोडे (गोष्ट एका पैठणीची ) उत्कृष्ट गीते : गुरु ठाकूर, (बापल्योक) उत्कृष्ट संगीत: राहुल देशपांडे (मी वसंतराव ) उत्कृष्ट **। पान २ वर**

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात हेल्पलाईन सुरु

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ तालुक्यातील सर्व पात्र महिलांना मिळावा यासाठी त्यांच्या अडचणी सोडविण्याकरीता पंढरपूर तहसिल कार्यालय येथे ०२१८६-२२३५५६ हा हेल्पलाईन क्रमांक सुरु करण्यात आला आहे. या योजनेतर्गंत ज्या लाभार्थ्यांना कुठल्याही अडचणी किंवा समस्या आल्यास हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही शासनाची महत्वाकांक्षी योजना असून, त्याव्दारे पात्र लाभार्थी महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येतात. तालुक्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही याकरीता तालुका प्रशासन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने अहोरात्र काम करीत आहेत. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वांवलंबीकरण, आत्मनिर्भर करण्याबरोच महिलांच्या सशक्तीकरणाला चालना देण्याकरीता 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत समाजातील सर्व घटकातील पात्र महिलांना




प्रतिमाह १ हजार ५०० रुपयांचा लाभ देण्यात येणार असून त्याकरीता महिलांनी तात्काळ अर्ज करावे, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेकरीता पंढरपूर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, या योजनेकरिता तालुक्यातून **। पान २ वर**

## शरद पवार भाजपला देणार सोलापूर जिल्ह्यात सर्वात मोठा धक्का

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभेपूर्वी पंढरपूर मधील बडा नेता तुतारी ठोकणार, या चिमण्यांनो परत फिरा अरे आशिष साद खासदार पवार जिल्ह्यातील जुन्या मंडळींना घालणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील पुन्हा शरद पवार राष्ट्रवादीमय करण्यासाठी स्वतः शरद पवार मोठी खेळी खेळण्याच्या तयारीत आहेत सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील सकारातील बडे मातब्बर म्हणून समजले जाणारे भाजपचे नेते प्रशांतराव परिचारक शरद पवार यांच्या गटाच्या वाटेवर असल्याची माहिती सूत्राने दिली आहे स्वतः प्रशांतराव परिचार हे किंवा उमेश परिचारक पंढरपूर मंगळवे



विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छुक असल्याची माहिती मिळत आहे परिचारक बंधू यांच्या उमेदवारीमुळे महायुतीचे भाजपचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांचे टेन्शन वाढण्याची शक्यता आहे

सूत्राने दिलेल्या माहितीनुसार आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आहे राज्यातील सर्व नेत्यांनी वीर मतदार संघात चाचपणी सुरू केली आहे पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार समाधान आवताडे असल्याने त्यातच १२ राज्यातील नियुक्त सभेचे निवडणुकीच्या यादीत भाजप कडून पक्षांतराव पाटील **। पान २ वर**

## नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेसमध्ये आघाडी; जम्मू आणि काश्मीरमधील सर्व ९० जागांचे वाटप लवकरच



**दैनिक यशसिद्धी न्युज**

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या सर्व ९० जागांवर काँग्रेसबरोबर आघाडी निश्र्चित झाली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांच्या निवासस्थानी नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांबरोबर बैठक झाल्यानंतर ही घोषणा करण्यात आली.नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांनी पत्रकारांना **। पान २ वर**

## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची कृषिमंत्री धनंजय मुंडेकडून पाहणी




**दैनिक यशसिद्धी न्युज**

परळी वैद्यनाथ/प्रतिनिधीः राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रथमच परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव अंतर्गत भरवण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन समारंभ संपल्यानंतर भेट देऊन पाहणी केली.

कृषी क्षेत्रात लागलेले नवनवीन शोध, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन आधुनिक अवजारे यांसह विविध शेती उत्पादने आदींची शेकडो दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली असून नॅनो खतांची ड्रोन द्वारे फवारणी करण्याची **। पान २ वर**

## पंढरपूर एम.आय.डी.सी चे लवकरच भूमिपूजन
### कासेगाव हद्दीत ५४ एकर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित

### पंढरपूर औद्योगिक वसाहतीच्या उभरणीतील महत्वाचा टप्पा : आ.समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांचे यश

**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर औद्योगिक वसाहतीसाठी कासेगाव हद्दीतील ५४ एकर जमीन उद्योग मंत्रालयाने 'औद्योगिक क्षेत्र ' म्हणून जाहीर केले आहे. त्यामुळे पंढरपूर एम आय डी सीच्या उभारणीला आता गती येणार आहे. लवकरच ाळवल चे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते, चार प्रमुख वाऱ्या वर उदरनिर्वाह करणारे गाव अशीही पंढरपूरची ओळख आहे. पंढरपूर तालुक्यातील हजारो युवक रोजगाराच्या शोधत पुण्या - मुंबईला जातात. स्थानिक पातळीवर एम आय डी सी असावी अशी मागणी अनेक दशकांपासून केली जात आहे. मात्र आजवर राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी एम आय डी सी मंजूर झाली नाही. बऱ्याच वेळी स्थानिक राजकारणाच्या कुरघोडी मुळे एम आय डी सी उभारणीत खोडा घातला जात होता. परंतु आ. समाधान आवताडे यांनी गेल्या केवळ दोन वर्षात सातत्याने पाठपुरावा करून, कासेगाव हद्दीत एम आय डी सी मंजूर करून घेतली. आणि आज ( दि. २१ ऑगस्ट) पासून कासेगाव हद्दीतील गट नंबर १९४७/४,१९४७/६, १९४७/ ८ मधील हे क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून उद्योग मंत्रालयाने जाहीर केले आहे. त्यामुळे लवकरच पंढरपूर एम आय डी सी उभारणीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे. येथील औद्योगिक वसाहतीच्या उभरणीतील महत्वाचा टप्पा पार झाला आहे. आ. समाधान आवताडे यांनी मागील दोन वर्षांपासून यासाठी प्रयत्न आणि पाठपुरावा केला आहे.

कासेगाव हद्दीतील जागेचा प्रस्ताव **। पान २ वर**



पंढरपूर तालुक्यात गेल्या दहा वर्षांपासून मी सार्वजनिक काम करतोय, या दरम्यान हजारो युवकांनी एम आय डी सी ची गरज बोलून दाखवली. आणि मलाही याची गरज जाणवत होती. सुदैवाने पोटनिवडणुकीत जनतेने आमदार केले..त्यानंतर एम आय डी सी चां विषय मी प्राधान्याने हाती घेतला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री ना.उदय सामंत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या सहकार्यामुळे लवकरात लवकर हा विषय मार्गी लावता आला याचे समाधान आहे. जागा निश्र्चित झाली आहे आता लवकरच भूमिपूजन करू–**आ.समाधान आवताडे**

पंढरपूर शहर आणि तालुक्यात कुशल मनुष्यबळ, चांगली रस्ते कनेक्टीव्हीटी, रेल्वे सेवा, मुबलक पाणी, साखर कारखानदारी, फळ शेती असल्याने उद्योगासाठी पोषक वातावरण आहे..मात्र एम आय डी सी अभावी हजारो युवकांना रोजगार शोधत बाहेर जावे लागत होते. अनेकांना जागेअभावी उद्योग उभा करता आले नाहीत, काही उद्योजक तालुक्या बाहेर निघून गेले. मात्र आता एम आय डी सी मंजूर झाल्याने पंढरपूरच्या उद्योगाच्या विकासाला संधी मिळेल, रोजगार वाढेल – **बाळकृष्ण सूर्यवंशी, उद्योजक अनवली, पंढरपूर**

## जिल्ह्यात मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान यशस्वी होण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्परात समन्वय ठेवावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा दिनांक १ किंवा २ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर शहरातील होम मैदान येथे नियोजित आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून ४०० बस च्या माध्यमातून तीस हजार महिला लाभार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन करण्यात येत असून हा वचनपूर्ती सोहळा यशस्वी होण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून कामे करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय माळी, पोलीस उपाधीक्षक गृह विजया कुर्री, पोलीस उपायुक्त वाहतूक सुरेश खिरडकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोळावा कार्यक्रम सोलापूर शहरातील होम मैदान येथे घेण्याचे नियोजित आहे. त्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी त्यांच्यावर सोपविण्यात येत असलेले जबाबदारी अत्यंत




काळजीपूर्वक व परस्परात समन्वय ठेवून पार पाडावी. या मेळाव्यासाठी किमान २५ ते ३० हजार महिला लाभार्थी संपूर्ण जिल्हाभरातून तालुका निहाय आणण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या ४०० बसेसची व्यवस्था राज्य परिवहन महामंडळाने करावी. या मेळाव्यासाठी येणाऱ्या महिलांसाठी जेवण पाणी व अनुषंगिक व्यवस्था जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळी परिस्थिती पाहता योग्य मंडप व अनुषंगिक व्यवस्था योग्य पद्धतीने करावी असे निर्देश त्यांनी दिले. या ठिकाणी येणाऱ्या लाभार्थ्यांसाठी किमान २५० मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी. महापालिकेने शहरातील स्वच्छतेबरोबरच होम मैदानाची ही स्वच्छता करून घ्यावी. पार्किंगची व्यवस्था पोलीस विभागाने पहावी. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी योग्य नियोजन करावे. सर्वप्रथम सर्व विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिनिस्त सहकारी अधिकाऱ्यांचे आदेश काढून घ्यावेत. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कामकाजाच्या सोयीसाठी अनुषंगिक समित्यांचे गठण करून प्रत्येक समितीला जबाबदारी सोपवावी, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सूचित केले.

## संपादकीय

### आता राजकीय घडमोडी ..

विधानसभा निवडणुकीसाठी जेमतेम तीन महिन्यांचा कालावधी बाकी असतानाच आणि सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकीची तयारी केली असतानाच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, हा विषय समोर येऊ लागला आहे. सध्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी हा विषय जास्त चर्चेत ठेवला आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये अद्याप या विषयाची चर्चा सुरू झाली नसली, तरी अंतर्गत पातळीवर काही प्रमाणात मात्र निश्चितच कुजबूज सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी सत्ताधारी महायुतीचा महाराष्ट्रात जोरदार पराभव केल्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्येही अशाच प्रकारच्या जोरदार यशाची खात्री महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे. त्यातूनच हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, हा विषय समोर आला आहे. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत सातत्याने उध्दव ठाकरे हेच महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असतील, असे सांगत आहेत. महाविकास आघाडीतील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष यांनी मात्र उध्दव ठाकरे यांचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून अद्याप मान्यता दिलेली नाही. उलट काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अत्यंत स्पष्ट शब्दामध्ये ही मागणी नाकारली आहे. शरद पवार यांनीसुध्दा विधानसभा निवडणूक सामूहिक नेतृत्वाच्या पध्दतीने लढवली जाईल, असे सूतोवाच केले आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष असला तरी त्यांनी आपल्यापेक्षा छोटा पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे मुख्यमंत्रिपद बहाल केले आहे आणि आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये या विषयावरून वाद होण्याची शक्यता कमी आहे. जरी एकीकडे दीडशेपेक्षा जास्त जागा लढवण्याचा निर्धार भाजपच्या नेत्यांनी केला असला आणि एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उर्वरित जागा देण्यात येणार असल्या तरीही मुख्यमंत्रिपदाचा विषय अद्याप महायुतीच्या नेत्यांनी चर्चेला घेतलेला नाही. या विषयावरून वाद नको अशीच भूमिका महायुतीच्या नेत्यांनी घेतलेली दिसते. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेते मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण हा विषय जास्त ताणणार नाहीत आणि सामूहिकपणे मतदारांना सामोरे जातील अशी अपेक्षा या निमित्ताने करावी लागणार आहे. बहुमत मिळाल्यावर मुख्यमंत्री कोण, हे ठरवणे जास्त योग्य हे सर्वांनी समजून घ्यायला हवे. एकूणच आता राजकीय घडमोडी वाढणार आहेत.

# मी संघर्ष करून अस्पृश्यात जाज्वल्य स्वाभीमान निर्माण केला आहे. वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाट्याला कोणीही जाणार नाही. : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६१ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १७ आगष्ट १९५२ ला मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संदेश दिला होता की, मी संघर्ष करून अस्पृश्यात जाज्वल्य स्वाभिमान निर्माण केला आहे. तसेच ९ आगष्ट १९५३ ला औरंगाबाद येथे संदेश दिला होता की, वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाट्याला कोणीही जाणार नाही. करिता संदर्भीय विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त सद्यस्थितीत यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ- : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६१ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १८ आगष्ट २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. कोंडबा हाटकर म्हणाले की, ज्यांना माहिती नाही, त्यांना माहिती दिली पाहिजे. चळवळीमुळे ज्यांनी गाडी, बंगले मिळविले अशा शिक्षितांकडून ऊर्वरीत कार्य करणे अपेक्षित आहे. माणसं भौतिकतेत गुरफटलेली आहेत. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते की, मुझे पढ़े लिखे लोगों ने धोका दिया है। आपणही त्यातच मोडतो की काय? हे तपासले पाहिजे. आपल्या चळवळी, पक्ष, संघटना मोडकळीस आल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभे केलेले काम हेच आपल्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

याप्रसंगी अमित खिल्लारे म्हणाले की, पुढील पिढी वाचविण्यासाठी आपले कार्य सुरू आहे. सर्व माणसं सारखी आहेत. शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगता आले पाहिजे. करिता बाबासाहेब म्हणाले होते की, जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायची आहे. धर्मानंद जाधव म्हणाले की, झोपलेल्या अवस्थेतील समाजाला जागृत करण्यासाठी आपले कार्य आहे.

डॉ. रामेश्र्वर वर्शिळ म्हणाले की, आपली माणसं शिक्षणामुळे पुढे जात असल्याचे प्रस्थापितांच्या लक्षात आल्याने ते आपणांस शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न करीत आहेत. करिता संघटीत होऊन रस्त्यावरील आंदोलन चालविण्यासाठी समाजाविषयी तळमळ असली पाहिजे. राहुल मेश्राम म्हणाले की, माणूस असून आपणास पशूंचे जीवन जगावे लागत होते. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवाची पर्वा न करता आपणांस त्यातून मुक्त केले. परिणामी गावकुसाबाहेरची माणसं शहरात आली. सर्व काही आयते मिळाल्याने आपणांस त्याची किंमत वाटत नाही. त्रास सहन करावा लागू नये म्हणून आपण वाघासारखे बनले पाहिजे. डॉ. कैलास झिने म्हणाले की, ज्या काळात आपली माणसं मृत जनावरांचे मास खायचे त्या काळात अज्ञानी समाजाला दिलेला हा संदेश आहे. वाघासारखे बनले पाहिजे आणि सामाजिक एकिकरणातून सांघिक सामर्थ्य निर्माण करून एकजिनसी समाज बनविला पाहिजे. शेवटच्या घटकांपर्यंत ज्ञान पोहचवले पाहिजे. केवळ १४ एप्रिलला एक दिवस वाघ बनून चालणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सिडनेहॅम कॉलेजमध्ये नौकरी करीत असताना मिळणाऱ्या ४५० रुपये पगारातून फक्त ५० रुपये घर खर्चासाठी रमाईला देत असायचे, ऊर्वरीत पैशाचा त्यांनी पुढील शिक्षणासाठी वापर केला आहे.

याप्रसंगी प्रमुख वक्त्या प्रा. मंगला झिने म्हणाल्या



की, शेड्युल्ड कास्ट इंम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या माध्यमातून एक हॉल बांधून, पगारी नोकर ठेवून देशभरात होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी कार्यालयीन कामकाज चालवावे, ज्यामुळे स्वाभिमानी आंदोलन चालविता येईल, अशी बाबासाहेब आंबेडकरांची अपेक्षा होती. त्या काळात जळगांव सारख्या परिसरात ब्राह्मण भोजने घालण्याची प्रथा होती. ज्यातील उष्ट्या पत्रावळी उकिरड्यावर टाकल्या जात होती, त्यावरील उष्टे अन्न गोळा करण्यासाठी अस्पृश्य परस्परांवर तुटून पडायचे परिणामी भांडणे व्हायची अशी माणूसकीहीन वागणूक मिळायची. तसेच यांच्या गळ्यात मडके, ढुंगणाला झाडू, हातात घुंगरांची काठी घेऊन फिरावे लागत असे, तरी त्यांना याचे फारसे काही वाटत नव्हते. त्यांच्या साठी १९३२ ला गोलमेज परिषदेतून स्वतंत्र मतदारसंघाच्या माध्यमातून रॅम्से मॅकडोनाल्ड यांचेकडून आपले हक्क अधिकार मिळवून आणले होते. जी कवच कुंडले पुणे कराराच्या माध्यमातून हिरावून घेण्यात आली. अशा लोकांत जाज्वल्य स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. उद्घाटक डॉ. कोंडबा हाटकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुझे पढ़े लिखे लोगोंने धोका दिया है। याचा उल्लेख करून शिकल्या सवरलेल्या लोकांच्या भूमिकेवर रोष व्यक्त करताना आपल्या व्यथा मांडणारी एखादी व्यक्ती संसदेत नसल्याची खंत व्यक्त केली. त्यांचा रोष बरोबर असला तरी सदरील वाक्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ मार्च १९५६ ला आग्र्याला रामलीला मैदानावर दिलेल्या भाषणात पहायला मिळत नाही. उलटपक्षी २५ वर्षापूर्वी बाबासाहेब राजकारणात का आले होते? याची कारणे त्या भाषणात स्पष्ट केलेली आहेत. हे जर आपण जनतेला पटवून देऊ शकलो असतो तर मग आपल्या व्यथा मांडणारे प्रतिनिधी संसदेत निवडून गेले असते. तसेच त्यांनी चर्चेतील मुद्द्यांवर शासन दरबारी पाठपुरावा केला पाहिजे असेही म्हटले. होय निश्र्चितच चर्चेतील समस्या शासनदरबारी गेल्या पाहिजेत. सध्या महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रे आपल्या बातम्यांना प्राधान्य देत असल्याने जनतेच्या दरबारी मांडण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. मात्र शासन दरबारी संदेश पोहचवण्यासाठी योग्य मार्गाने निवेदन दिले पाहिजे. परंतु यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेतला तर निश्र्चित तशी कृती केली जाऊ शकेल. तसेच ज्वलंत मुद्यावर विषय निर्धारित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. होय तर आपण चर्चेसाठी घेतलेल्या सर्व ऐतिहासिक विषयाचा वर्तमान काळात असलेल्या संबंधांने विवेचन केले जाते. एवढेच नव्हे तर १ आगष्ट २०२४ ला आरक्षित संवैधानिक समूहाच्या उप वर्गीकरणाच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर त्वरीत कार्यशाळा आयोजित करून जनतेला सजग करण्याचा आपण प्रयत्न केला आहे. करिता आपण सर्वांनी परस्पर समन्वय, सहकार्य व सहभागाने या कार्याला वेगाने गतिमान केले पाहिजे. मानवी चारित्र्यात न्यूनता पहायला मिळत असल्याने शील व सौजन्य नसेल तर तो माणूस हिंस्र पशूपेक्षाही क्रुर व भितीप्रद समजण्यात यावा त्याची प्रचिती येत आहे, जे बाबासाहेब आंबेडकरांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ आगष्ट १९५२ ला त्यांच्या कार्याची दिशा तीन पद्धतीची असल्याचे स्पष्ट केले होते.

एक अस्पृश्य समाजात प्रथम स्वाभिमान निर्माण करणे, दुसरे त्यांना राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठी जागृत करणे व तिसरे त्यांच्या साठी शिक्षणाची द्वारे खुली करणे होय. यात त्यांनी 'केवळ माझे नाव घेऊन जयजयकार करण्यापेक्षा जी गोष्ट माझ्या दृष्टीने अत्यंत मोलाची आहे ती करण्यासाठी प्राणाच्या मोलाने तुम्ही झटा.' तसेच मेंढरा, बक-याला कुणीही कापून खतात पण वाघाचा तसा वापर केला जात नाही म्हणून आपण वाघासारखे बना म्हणजे आपल्या वाट्याला कुणीही जाणार नाही. असा संदेश दिला होता. जे आज ही तेवढेच प्रासंगिक आहे. म्हणून आपण दोन्ही विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त महत्वपूर्ण ज्वलंत विषयावर चर्चा करीत आहोत.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला धर्मानंद जाधव, डॉ. कोंडबा हाटकर, बळिराम वानखेडे, डॉ. रामेश्र्वर वर्शिळ, प्रा. मंगला झिने, राहुल मेश्राम, अमित खिल्लारे, डॉ. कैलास झिने, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे अमित खिल्लारे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

पान १ वरुन

### गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार..

पार्श्र्वसंगीत: विजय गवंडे (बापल्योक ), उत्कृष्ट पार्श्र्वगायक: राहुल देशपांडे (मी वसंतराव ) उत्कृष्ट पार्श्र्वगायिका:प्राची रेगे (गोदाकाठ)उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक : सुजितकुमार (चोरीचा मामला ) उत्कृष्ट अभिनेता: राहुल देशपांडे (मी वसंतराव ) उत्कृष्ट अभिनेत्री : मृण्मयी गोडबोले (गोदाकाठ ) उत्कृष्ट विनोदी अभिनेता : जितेंद्र जोशी (चोरीचा मामला )सहाय्यक अभिनेता : विठ्ठल काळे (बापल्योक ), सहाय्यक अभिनेत्री: प्रेमा साखरदांडे (फनरल), प्रथम पदार्पण अभिनेता: ऋतुराज वानखेडे ( जयंती), उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्री : पल्लवी पालकर (फास )

**५९ वे राज्य चित्रपट पुरस्कार खालीलप्रमाणे –**

सर्वोत्कृष्ट कथा : मंगेश जोशी, अर्चना बोराडे ( कारखानिंसांची वारी), उत्कृष्ट पटकथा :रसिका आगासे ( तिचं शहर होणं ), उत्कृष्ट संवाद : नितीन नंदन ( बाल भारती ) उत्कृष्ट गीते:जितेंद्र जोशी ( गोदावरी ) उत्कृष्ट संगीत: अमित राज ( झिम्मा) उत्कृष्ट पार्श्र्वसंगीत : सारंग कुलकर्णी ( कारखानीसांची वारी), उत्कृष्ट पार्श्र्वगायक :राहुल देशपांडे ( गोदावरी ), उत्कृष्ट पार्श्र्वगायिका :आनंदी जोशी ( रंगिले फंटर), उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक :फुलवा खामकर ( लक डाऊन लश ीळिंळींश ) उत्कृष्ट अभिनेता :जितेंद्र जोशी ( गोदावरी,) उत्कृष्ट अभिनेत्री : सोनाली कुलकर्णी ( तिचं शहर होणं ), उत्कृष्ट विनोदी अभिनेता : भालचंद्र कदम ( पांडू ) सहाय्यक अभिनेता : अमेय वाघ ( फ्रेम ) सहाय्यक अभिनेत्री : हेमांगी कवी ( तिचं शहर होणं ), उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता : योगेश खिल्लारे ( इंटर नॅशनल फालमफोक )' उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्री : श्रुती उबाले (भ्रमणध्वनी),उत्कृष्ट विनोदी अभिनेत्री : निर्मिती सावंत ( झिम्मा )

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण..

सुमारे ९५ हजार महिलांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी ७० हजार लाभार्थ्यांना मान्यता देण्यात आली आहे उर्वरित २५ हजार लाभार्थ्यांची छाननी येत्या दोन दिवसांत पुर्ण करण्यात येणार आहे. यापुर्वी पात्र ठरलेल्या महिलांना १४ ऑगस्टपासून प्रत्यक्ष लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यामुळे महिलावर्गात समाधानाची भावना व्यक्त होत आहे, प्रशासनाच्यावतीने प्राप्त प्रत्येक अर्जाची छाननी करण्यात आली. छाननीअंती पात्र ठरलेल्या महिलांच्या बँक खात्यात १४ ऑगस्टपासून जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून प्रत्येकी ३ हजार रुपये जमा करण्यास सुरुवात झाली आहे असे महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे यांनी सांगितले.

तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेकरीता अर्ज केलेल्या पंढरपूर तालुक्यातील २ हजार ३५५ पात्र महिलांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी तत्काळ ईकेवायसी संबधित बॅकेत करुन घ्यावे असे आवाहनही बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री नागणे यांनी केले आहे.

### शरद पवार भाजपला देणार सोलापूर ..

यांचा सात विचार केला गेला नसल्याने परिचारक बंधू यांची नाराजी उघड झाली आहे

विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे प्रशांतराव परिचारक किंवा उमेश परिचारक शरद पवार गटातून निवडणूक लढवणार असल्याची घोषणा करणार असल्याची बोलले जात आहे यासाठी प्रशांतराव परिचारक कार्यकर्त्यांचा मेळावा घेणार आहे आणि सध्या प्रशांतराव प्रचारक यांच्या गटाकडून खेळ पैठणीचा हाही कार्यक्रम मंगळवेढा तालुक्यात मोठ्या प्रमाणात घेतला जात असल्याने दिसत आहे त्यासाठी परिचारक समर्थक कार्यकर्ते मोठ्या हिमतीने कामाला लागले आहेत

दरम्यान काही दिवसापूर्वी प्रशांत परिचारक उमेश परिचारक बंधूंनी काही दिवसापूर्वी शरद पवार यांची मुंबई येथे भेट घेतली जी चर्चा असून अपक्ष लढवण्याबाबत विधानसभा निवडणूक लढण्याचे विधान केली होती परंतु मंगळवेढा विधानसभेच्या उमेदवारीवरून भाजपमध्ये वाद रंगण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे प्रशांत परिचारक यांनी अपक्ष लढण्याची जोरदार तयारी केल्यास भाजपचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे

### जम्मू आणि काश्मीरमधील सर्व ..

सांगितले की, 'आमची बैठक सौहार्दपूर्ण वातावरणात झाली. आघाडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले असून आम्ही सर्व ९० जागांसाठी करारावर स्वाक्षरी करू.'

मू-काश्मीर विधानसभेसाठी १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबरला तीन टप्प्यांत निवडणुका होणार आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, ''आघाडी होत आहे आणि मला आशा आहे की, आमच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना योग्य सन्मान मिळेल. स्वातंत्र्यानंतर केंद्रशासित प्रदेश राज्ये बनली आहेत, परंतु राज्य केंद्रशासित प्रदेश बनण्याची ही पहिलीच वेळ आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील लोकांना त्यांचे लोकशाही अधिकार परत मिळावेत, यासाठी आमचे प्राधान्य असेल, असे आम्ही जाहीरनाम्यात स्पष्ट केले आहे.' माकप नेते एम.वाय. तारिगामी यांना आघाडीमध्ये सामील करून घेण्याबद्दल अब्दुल्ला यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. अब्दुल्ला यांनी आशा व्यक्त केली की लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी ही आघाडी प्रचंड बहुमताने विजयी होईल. सर्व अधिकारांसह पूर्ण राज्याचा दर्जा बहाल केला जाईल. अब्दुल्ला म्हणाले की, देशात सध्या असलेल्या फुटीरतावादी शक्तींना पराभूत करण्यासाठी निवडणूक लढवणे हा आमचा समान कार्यक्रम आहे. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीपूर्वी सर्व तपशील उघड केला जाईल, असे ते म्हणाले. निवडणूक लढवणार की नाही या प्रश्नावर मात्र अब्दुल्ला यांनी मौन बाळगले.

### राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची

प्रात्यक्षिके सुद्धा येथे दाखवण्यात येत आहेत. या स्टॉल्सला भेटी देण्यामध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे हे तब्बल साडेतीन तास रमले होते. जवळपास ७.३० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत त्यांनी जवळपास ३३५ स्टॉल्सला भेटी देऊन पाहणी केली व त्यांच्याकडील उत्पादनांची व तंत्रज्ञानाची माहिती घेतली. चारही कृषी विद्यापीठाचे स्टॉल्स या ठिकाणी उभारले असून, तेथील उपक्रमांचीही मुंडेंनी माहिती घेतली.या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्यासाठी आणि शेतीमध्ये अधिक समृद्धी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व लाभ मिळवावा, असे आवाहन याप्रसंगी धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक श्री.मुळे, आत्माचे जिल्हा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांसह अधिकाऱ्यांनी श्री मुंडे यांना माहिती दिली. प्रसंगी पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, त्यालाही शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पुढील चारही दिवस अविरत सुरू राहणार आहे.

स्टॉल ठिकाणीच धनंजय मुंडे यांचा नाश्ता

काल सकाळपासूनच कार्यक्रमाची लगबग होती. सायंकाळी उशिरापर्यंत जेवणालाही वेळ मिळाला नाही, त्यामुळे सायंकाळी स्टॉल पाहत असतानाच धनंजय मुंडे यांनी स्टॉलवर असलेले विविध मिलेटपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, फळे यांचा शेतकऱ्यांच्या सोबत आस्वाद घेतला.

### पंढरपूर एम.आय.डी.सी चे लवकरच..

औद्योगिक विकास महामंडळास । पान २ वर

पाठवला होता.औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कासेगाव येथे येऊन जागेची पाहणी केली होती. त्यानंतर आ. आवताडे यांनी उद्योग मंत्रालय, औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सतत पाठपुरावा चालू ठेवला होता.अखेर आज ( दि २१ रोजी ) उद्योग मंत्रालयाकडून राज्यपालांच्या आदेशानुसार ५४ एकर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केले आहे. आ. आवताडे यांनी उद्योग मंत्रालयाचे सहसचिव संजय देगावकर यांच्याकडून हा अध्यादेश स्वीकारला आहे. त्यानंतर आवताडे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांचेही आभार मानले आहेत. पंढरपूर येथील एम आय डी सी. च्या उभरणीतील कासेगाव हद्दीतील जागा निश्र्चित केल्यामुळे पंढरपूर तालुक्यातील हजारो बेरोजगार युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळण्यासाठी मदत होणार आहे. शिवाय तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या औद्योगिक विकासाला ही चालना मिळणार आहे. पंढरपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालयांसह चांगल्या उच्च शिक्षण संस्था आहेत. त्यामुळे कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध आहे. भीमा नदी मुळे एम आय डी सी करिता पाणी उपलब्ध आहे.

शिवाय पंढरपूर शहर आणि तालुक्यात आता पक्क्या रस्त्याचे जाळे निर्माण झाले आहे. शिवाय रेल्वे सेवा पंढरपूर पर्यंत चालू आहे. त्यामुळे दर्शन एम आय डी सी उभारण्यासाठी पोषक परिस्थिती पंढरपूर मध्ये आहे, मात्र आजवरच्या राजकीय नेत्यांच्या उदासीनतेमुळे हा प्रश्न प्रलंबित राहिला होता.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्यादृष्टीने शेतमाल निर्यातीसाठी पायाभूत सुविधा शासन पुरविणार : अपर मुख्य सचिव अनूप कुमार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे : राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कृषी निर्यात हा सर्वोत्तम पर्याय असून यासाठी पायाभूत सुविधा, क्लस्टर, शीतगृहे तसेच वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुविधा पणन मंडळ आणि मॅग्नेट प्रकल्पाच्या समन्वयातून पुरविण्यात येतील, असे प्रतिपादन सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनूप कुमार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटीचे विश्र्वनाथ धारट, कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक




विनायक कोकरे, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

श्री. अनुप कुमार म्हणाले, महाराष्ट्र कृषी निर्यातीमध्ये आघाडीवर आहे. राज्यात पहिली कृषी निर्यात परिषद फेब्रुवारी २०२२ मध्ये झाली. या परिषदेत केंद्राच्या कृषी निर्यात धोरण २०१८ वर विचारमंथन करून राज्याचे कृषी निर्यात धोरण २०२१ जाहीर केले होते.

याच धोरणात सुधारणा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे. कार्गोचे मार्ग बदलल्याने निर्यात माल पोहचण्यास १५ ते २७ दिवस लागतात. रशिया आणि युक्रेन युद्ध, बांगला देशातील राजकीय घडामोडीचा परिणाम निर्यातीवर झाला आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

फळे आणि भाजीपाला मध्ये जगात चीननंतर आपल्या देशाचा दुसरा क्रमांक लागतो. पण असे असूनही आपली जागतिक पातळीवर निर्यात फक्त २.२ टक्के आहे. देशात फुलांच्या निर्यातीत राज्याचा ४३ टक्के वाटा आहे. राज्यात फक्त काही विकसित जिल्ह्यातूनच फळांची निर्यात होते. ही निर्यात इतर ठिकाणाहून झाली पाहिजे. युरोपियन देश, आखाती देशांना प्रामुख्याने आपल्या कृषीमालाची निर्यात होते. काही कारणाने यावर परिणाम झाल्यास अग्नेय आशियायी देशांना कृषीमालाच्या निर्यातीचा पर्याय शोधणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

सुधारित निर्यात धोरण तयार करण्याच्यादृष्टीने या परिषदेत विविध मुद्द्यांवर चर्चा व्हावी, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचा परिषदेस संदेश

यावेळी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी परिषदेला शुभेच्छा संदेश दिला. यात ते म्हणाले, कृषीमालाचा दर्जा वाढावा यासाठी कृषी पणन मंडळामार्फत मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले जात आहे.

शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, निर्यातदार यांच्या मेहनतीतून कृषी मालाला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी पणन मंडळ सतत प्रयत्न करत असते. त्यातून नवीन निर्यातदार तयार होत आहेत.

फळे, भाजीपाला व फुले निर्यातीकरिता आयातदार देशांच्या मागणीनुसार वाशी येथे विशेष प्रकिया सुविधा उभ्या केल्या आहेत.


त्याद्वारे विकीरण सुविधेमधुन आंबा व डाळिंब अमेरिका व ऑस्ट्रेलिया येथे, मसाल्याचे पदार्थ अमेरिका व युरोप येथे, व्हेपर हीट ट्रिटमेट सुविधेवरुन आंबा जपान, न्यूझिलंड, उत्तर कोरिया आदी तर भाजीपाला प्रक्रिया केंद्रावरुन युरोप आदींमधील देशांना भाजीपाला निर्यात केला जातो. फुलांच्या निर्यातीकरिता देखील मोठ्या प्रमाणात संधी आहे.

मॅग्नेट प्रकल्पातूनही शेतकऱ्यांना प्रशिक्षण व पायाभूत सुविधांसाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे. मॅग्नेट प्रकल्पामधुन पणन मंडळाच्या १६ सुविधांचे आधुनिकीकरण करण्यात येत असून ते अंतिम टप्प्यात आहे. तसेच फळे, भाजीपाल्याच्या निर्यातीकरिता बारामती, पाचोड व बोड येथे निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी अंतिम टप्यात आहे.

जागतीक बँक सहाय्यित स्मार्ट प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने राज्याने निर्यातीकरिता आवश्यक असलेले कलेक्शन सेंटर्स, पॅकहाऊसेस, निर्यात सुविधा केंद्रे, विकीरण सुविधा केंद्र यासारख्या अत्याधुनिक सुविधांची उभारणी कृषि पणन मंडळाकडुन नजिकच्या काळामध्ये केली जाणार आहे, असेही ते संदेशात म्हणाले.

प्रास्ताविकात श्री. कदम यांनी सांगितले, या परिषदेत अपेडा, डीजीएफटी, एनपीपीओ, जेएनपीटी, कॉनकोर, फेडरेशन ऑफ इंडियन एस्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलाचे यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे.

पॅकेजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबतदेखील चर्चा होणार आहे.



## अन्नदान ही श्रेष्ठ दान असून, न्यासाच्या परिसरातील स्वच्छतामुळे मन प्रसन्न : दिपाली भोसले

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अन्नदान ही श्रेष्ठ दान असून, न्यासाच्या परिसरातील स्वच्छतामुळे मन प्रसन्न होत असल्याचे मनोगत प्रसिध्द मराठी अभिनेत्री दिपाली भोसले सय्यद यांनी व्यक्त केल्या.त्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र (ट्रस्ट) मंडळात आल्या असता, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विश्र्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी नन्नु कोरबू व न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, विश्र्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, निखील पाटील, गोटू माने, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, अभियंता अमित थोरात,, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## श्री रुक्मिणी बँक परिवारांच्या वतीने पंढरीत खास महिलांसाठी मंगळागौरी स्पर्धेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधी : रुक्मिणी सहकारी बँकेच्या वतीने शहर व तालुक्यातील महिलांसाठी मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बँकेच्या संस्थापिका सचिवा सुमित्राताई पवार यांनी दिली या कार्यक्रमांमध्ये पोरा एक थेंब पानावरून घसरला कळीच्या गालावरून क्षणभर विसरला, आणि अलगद कुजबुजला सखे श्रावण आला, श्रावणाला अशा या हिरवाईच्या ऋतूमध्ये आपण भेटूयात साऱ्याजणी मंगळागौरीच्या खेळाचा आनंद घ्यायला श्री रुक्मणी विद्यापीठाच्या संस्थापिका व सचिवा सुनेत्रा ताई पवार यांची शुक्रवारी दिनांक २८/८/२०२४ रोजी सकाळी ११=०० वाजता श्रीराम मंगल कार्यालय केशवाई पंढरपूर येथे खास सखी साठी तिचं माझं व्यासपीठ कार्यक्रमांतर्गत श्रावण सरी मंगळागौर, स्पर्धेचे आयोजन केले केले आहे

या अंतर्गत स्मार्ट सासूबाई, नथ विषयी चारोळी महाराष्ट्रातील वेशभूषा, डोळे बांधून दहीहंडी फोडणे इत्यादी स्पर्धा सह खवय्यांसाठी स्टॉलचे हे आयोजन केले आहे

मंगळागौर स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रू,१०,०००/व ट्रॉफी दुतीय पारितोषक ७०००/व ट्रॉफी देऊन तर इतर स्पर्धांसाठी आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे यामधील सहभागासाठी जास्तीत जास्त महिला व महिला मंडळांनी भाग घेण्यासाठी विभावरी डुबल ९१७५६०५१३३, सविता लोखंडे, ८३९०३१६७२७, राणी गावडे ८३७९८९०६५७ वैशाली कदम ७०२८१०७७६९ यांच्याकडे संपर्क साधण्याचे कार्यक्रमाच्या संयोजिका सुप्रिया पवार यांनी सांगितले

## भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी राजश्री कदम



### तर सरचिटणीसपदी विद्यानंद वाघमारे यांची फेर निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा या दक्षिण धाराशिव जिल्हा कार्यकारिणीची निवड भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष एस के भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थिती मध्ये ही निवड करण्यात आली.

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा ही मात्र संस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली मानवाच्या कल्याणाचा बौद्ध संस्काराच्या जतन आणि पठण करण्यासाठी ही संस्था देशभर काम करत आहे याच भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष,एस के भंडारे , महाराष्ट्र राज्य संघटक बापूसाहेब गायकवाड, माजी जिल्हाध्यक्षा विजयमाला सुरेश धावरे यांच्या प्रमुख उपस्थिती बैठक संपन्न झाली .

भारतीय बौध्द महासभेच्या धाराशिव जिल्हा दक्षिण विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी राजश्रीताई कदम,तर जिल्हा सरचिटणीसपदी विद्यानंद वाघमारे यांची फेर निवड करण्यात आली तर जिल्ह्याच्या कोषाध्यक्षपदी कुमार ढेपे यांची निवड करण्यात आली जिल्हा संस्कार उपाध्यक्षपदी विजय बनसोडे संस्कार सचिव रत्नदीप मस्के सुकेशन ढेपे तर पर्यटन उपाध्यक्ष विश्र्वास पांडागळे यांची फेर निवड करण्यात आली जिल्हा पर्यटन विभागाच्या सचिव पदी बाबासाहेब जानराव , उमेश सुरवसे, जिल्हा महिला विभागांच्या उपाध्यक्षपदी शीलाताई चंदनशिवे, जिल्हा संघटक बाळासाहेब बागडे सुधाकर गायकवाड, अजय शितापुरे, जिल्हा संघटक ब्रह्मानंद गायकवाड यांच्या निवडी करण्यात आली .

यावेळी एस.के.भंडारे राष्ट्रीय उपाध्यक्ष,बापूसाहेब गायकवाड महाराष्ट्र संघटक यांनी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा सरचिटणीस विद्यानंद वाघमारे यांनी केले तर शेवटी आभार भारतीय बौध्द महसभेच्या नूतन जिल्हाध्यक्षा राजश्रीताई कदम यांनी मानल्या धाराशिव , तुळजापूर , लोहारा, उमरगा येथील भारतीय बौध्द महासभेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## बदलापूर येथील अत्याचाराच्या निषेधार्थ धाराशिव येथे तीव्र आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

धाराशिव/सुधाकर रणदिवे : बदलापूर येथील चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी या मागणीसाठी धाराशिव येथे बुधवारी दि. २१रोजी जोरदार आंदोलन करून महायुती सरकारचा निषेध करण्यात आला. लाडकी बहीण योजना राबविण्यापेक्षा सुरक्षित बहीण योजना राबविली असती तर महिला मुली सुरक्षित राहिल्या असत्या अशा तीव्र शब्दात शहरात जागोजागी फ्लेक्सबाजी करणारे महायुतीच्या पदाधिकाऱ्यांवरही रोष व्यक्त करण्यात आला. जोरदार घोषणा देऊन महायुती सरकार व अपयशी गृहमंत्र्याचा निषेध आंदोलकांनी केला. सर्वसामान्य महिला, विद्यार्थिनी, नागरिकासह, महाविकास आघाडीचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते. त्यावेळी बोलताना खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर म्हणाले की बदलापूर येथील घटना घडल्यानंतर पोलिसांनी ताबडतोब गुन्हा नोंद करून तात्काळ अटक करणे अपेक्षित होते परंतु पक्षीय राजकारणात अडकून अशा गंभीर घटनाकडे दुर्लक्ष करत असाल तर अशा सरकारचा आम्ही तीव्र निषेध करतो. साडेतीन वर्षाच्या मुली बाबत असे प्रत्येक करणाऱ्या कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी जेणेकरून भविष्यात अशा अनेक घटना घडणार नाहीत सहनशीलतेची मर्यादा संपल्यानंतर जनता गप्प बसणार नाही त्यामुळे अशा घटनांसाठी कटोरा कठोर



शिक्षेची तरतूद सरकारने करावी अशी मागणी ही त्यांनी केली.

बदलापूर मध्ये घडलेल्या घटनेत एखाद्या नराधमाला पाठीशी घालण्यासाठी तब्बल १२ तास गुन्हा नोंद करण्यास उशीर केला. त्यामुळे जन समुदाय उसळून सर्व सामान्य जनता रस्त्यावर उतरली. तेव्हा आंदोलकावर लाठी चार्ज करण्यात आला त्यामुळे राज्य कोणाचे आहे याचा सरकारने विचार करावा एकीकडे विरोधकांनी प्रायोजित केलेले हे आंदोलन आहे असे सांगून तुम्ही गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे त्यामुळे सरकारमधील लोकांनी आता तरी राजकारण बंद करावे लाडकी बहीण, योजने ऐवजी लाडकी बहीण, लाडकी लेक, सुरक्षित राहावी यासाठी सरकारने काम करणे गरजेचे आहे अशा घटना रोखण्यात गृहमंत्री आणि राज्य सरकार अपयशी ठरले आहे असे यावेळी आमदार कैलास घाडगे पाटील म्हणाले.

सक्षणाताई सलगर म्हणाल्या की कोपर्डीच्या प्रकरणानंतर ही सरकारला जाग आलेली नाही, तीन वर्षाच्या दोन चिमुरड्यावर शाळेतच लैंगिक अत्याचार होत असेल तर अशा घटना महाराष्ट्राला काळीमा फासणाऱ्या आहेत. याची जिम्मेदारी लाडकी बहीण, लाडकी बहीण म्हणून ओरडणाऱ्या सरकारने घेतलीच पाहिजे. महिलांना १५०० नको आता सुरक्षितता हवीय, तीन वर्षाचे बाळही या सरकारच्या काळात सुरक्षित नाही त्यामुळे गृहमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, राज्यात ठिकठिकाणी घडलेल्या अशा घटनांमधील पिढीताना न्याय न मिळाल्यास आम्ही एकाही मंत्र्याची गाडी रस्त्यावर फिरू देणार नाही. असा इशाराही सलगर यांनी दिला. यावेळी आंदोलनात सहभागी महिला विद्यार्थिनी ही अत्याचाराच्या घटनेचा निषेध करून गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या सरकार बद्दल तीव्र रोष व्यक्त केला त्यानंतर गुन्हेगारांना कठोर शिक्षा करण्याच्या मागणीचे निवेदन ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आले. आंदोलनात महाविकास आघाडीचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख भारत इंगळे, राष्ट्रवादी युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणाताई सलगर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख विजय सस्ते ,तालुकाप्रमुख सतीश सोमानी,कॉंग्रेस आय तालुकाध्यक्ष विनोद वीर, शाम भैया जाधव, शहरप्रमुख सोमनाथ गुरव, नितीन शेरखाने, मा. नगरसेवक राजाभाऊ पवार, सिद्धेश्र्वर कोळी, तुषार निंबाळकर, गणेश असलेकर, पंकज पाटील, शहर संकटक प्रशांत साळुंखे, व शहर प्रमुख बंडू आदरकर, सुरेश गवळी, प्रभाकर राजे निंबाळकर, उत्तम कांबळे, राष्ट्रवादी युवती जिल्हाध्यक्ष श्र्वेता दुर्गकर, शीलाताई उंबरे, भाग्यश्री रणखांब, प्रीती कदम, संजना गायकवाड, सुवर्णा कांबळे, राकेश सूर्यवंशी, सुमित बागल, जगदीश शिंदे, अमित उंबरे, संदीप शिंदे, महेंद्र शिंदे,रवी कोरे, बाळासाहेब मुंडे,हनुमंत देवकते, पांडुरंग भोसले, अविनाश शेरखाने, अभिजीत देशमुख, प्रशांत जगताप, छोटा साजिद, सतीश लोंढे, गणेश साळुंखे, अभिराज कदम, दिनेश बंडगर, सह्याद्री राजे निंबाळकर, अजिंक्य राजे निंबाळकर, गणेश राजे निंबाळकर, गफार काजी ,नाना गरड ,नाना घाडगे ,मुकेश पाटील, सौदागर जगताप, चंद्रकांत गायकवाड ,सुनील वाघ, पिंटू आंबेकर, यशवंत शहा पालक, धनंजय इंगळे, कलीम कुरेशी, दीपक पाटील, प्रवीण केसकर, सुधीर अलकुंटे, साबिर सय्यद, अमोल मुळे, सत्यजित पडवळ, महेश लिमये, ओंकार बांगर, योगेश गरड, मुकेश चौगुले, युवराज पवार, अमित गजने, प्रसाद पाटील ,चेतन वाटवडे, मनोज पडवळ, यांच्यासह नागरिक महिला युवती विद्यार्थिनी व महिला महाविकास आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## बदलापूर व कोलकाता येथील महिलावर अत्याचार करुन हत्या केलेल्या आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची राष्ट्रीय समाज पक्षाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : गेल्या दोन तिन दिवसापूर्वी बदलापूर येथील एका शाळकरी मुलीवर तसेच कोलकाता येथे एका महिला डॉक्टरवर अत्याचार करुन तिच्या हत्येस कारणीभूत असणाऱ्या आरोपीस त्वरित फाशीची शिक्षा देण्यात यावी यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष दाजी कोळेकर, अक्कलकोट शहर युवक आघाडीचे अध्यक्ष निलेश लवटे, अक्कलकोट तालुका सरचिटणीस गजानन हिळ्ळी, आंदेवाडी खुर्दचे सरपंच शिरु यळमेली, स्वामीनाथ सोलंकर, प्रसाद मुकडे, राजू पाटील, सुरज तिवारी, संतोष फुलारे, रवी बजंत्री, यलप्पा



कोटी आदी उपस्थित होते.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की बदलापूर येथे चिमुकल्या मुलीवर तसेच कोलकाता येथे महिला डॉक्टरवर अत्याचार आणि तिच्या हत्येस कारणीभूत असणाऱ्या आरोपीस त्वरित अटक करून त्याला भरचौकात फाशी देण्यात यावी. देशात आणि राज्यात अत्याचाराच्या घटना वाढतच चाललेले आहे. देशातील आणि महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. राज्यात लाडकी बहिण योजना आणून महिलांना खुश करण्याचे काम एकीकडे केले जात असताना दुसरीकडे त्यांना सुरक्षा कवच पुरवण्याचे काम शासनाने करावे. असे कृत्य पुन्हा या देशात आणि महाराष्ट्रात होऊ नये म्हणून केंद्र सरकारने कडक महिला सुरक्षित नसल्याने त्या नराधमांना कडक शिक्षा करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

